# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## दूरशिक्षण संचालनालय

### पदव्युत्तर पदवी (एम.ए.) प्रथम वर्ष

### * इतिहास *



**खंड क्र. (०२) मध्ययुगीन भारताचा इतिहास**

(इ.स. १२०६ ते १७०७ पर्यंत)

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची साधने | डॉ. चेतनकुमार व्यास<br>डॉ. नितीन बावळे | ०१ |
| २ | सुलतानशाहीचा संक्षिप्त इतिहास | डॉ. वसंत कदम | १८ |
| ३ | सुलतानशाहीकालीन जीवन | डॉ. नागनाथ भद्रे | ५२ |
| ४ | मुघलांचा संक्षिप्त इतिहास | डॉ. मोहन मिसाळ | ७३ |
| ५ | मुघलकालीन जीवन | डॉ. किशन केंद्रे | १०९ |
| ६ | बहमनी व विजयनगरचा संक्षिप्त इतिहास | डॉ. नितीन बावळे | १३३ |

## घटक क्र. (०२) सुलतानशाहीचा संक्षीप्त इतिहास


**२.० प्रास्ताविक**

**२.१उद्दिष्ट्ये**

**२.२ महम्मद घोरीचे भारतावरील आक्रमण (गुलाम घराणे)**

२.१.१ कुतुबुद्दिन ऐबक

२.१.२ सुलतान शम्शुदिन अल्तमश

२.१.३ रझिया सुलतान

२.१.४ घियासुद्दिन बल्बन

**२.३ खिलजी घराणे**

२.३.१ जलालुद्दिन खिलजी

२.३.२ अलाउद्दिन खिलजी

२.३.३ अलाउद्दिन खिलजीने केलेल्या सुधारणा

**२.४ तुघलक घराणे**

२.४.१ गियासुद्दिन तुघलक

२.४.२ मुहम्मद बिन तुघलक

२.४.३ फिरोजशाहा तुघलक

**२.५ सय्यद व लोदी घराणे, दिल्ली सुलतानशाहिचा अस्त**

२.५.१ सय्यद घराणे

२.५.२ लोदी घराणे

२.५.३ दिल्ली सुलतानशाहीचा ऱ्हास

**२.६ सारांश**

**२.७ पारिभाषिक शब्द**

**२.८ प्रश्नांची आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)**

**२.९ स्वाध्याय**

**२.१० संदर्भ ग्रंथ**


### २.० प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, आपण मागील घटकांमध्ये मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची वाङ:मयीन आणि भौतिक साधनांचा अभ्यास केलेला आहे. वाङ:मयीन म्हणजेच साहित्यीक साधनामध्ये चचनामा, तबकात–ए–नासीरी, ताजुल मासिर, तारीख–ए– फिरोजशाही, इ. ग्रंथ, ललित साहित्य, प्रवास वर्णने इत्यादी तर पुरातत्त्वीय किंवा भौतिक साधनामध्ये नाणी, अभिलेख, किल्ले, मंदिरे, शस्त्रास्त्रे इमारती गढी व वाडे इत्यादी साधनांच्या माध्यमातुन इतिहासाची ओळख करुन घेतली आहे. आता या सदरील घटकामध्ये आपण सुलतानशाहीचा संक्षिप्त इतिहास यात महम्मद घोरीचे

भारतावरील आक्रमण, भारतात मुस्लीम सत्तेची स्थापना, गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे तसेच सय्यद व लोदी घराणे आणि सुलतानशाहीचा ऱ्हास इत्यादी बाबींचा सविस्तर आढावा या घटकामध्ये घेणार आहोत.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना खऱ्या अर्थाने ज्या कालखंडापासून भारताच्या मध्ययुगाची सुरुवात होते तो कालखंड म्हणजे सुलतानशाहीचा कालखंड होय. भारतावर प्रारंभी महम्मद बीन–कासिमने इ.स. ७११ मध्ये त्यानंतर महम्मद गझनीने इ.स. १००० ते इ.स. १०२७ पर्यंत भारतावर १७ स्वाऱ्या केल्या आणि सिंध, पंजाब व उत्तरभागताचा बराचसा प्रदेश जिंकला पण गझनी ने भारतात आपली राजकीय सत्ता स्थापन केली नाही. त्यानंतर दिडशे वर्षानी गझनीचाच सुलतान महम्मद घोरीने इ.स. ११७५ ते इ.स. १२०६ कालखंडात अनेक आक्रमण केली. या आक्रमनांचे अत्यंत दुरगामी असे परिणाम घडुन आले. त्यावेळी उत्तर भारतात अनेक राजपुत सत्ता आपआपल्या प्रदेशात स्वतंत्र राज्य करीत होत्या. तसेच हे राज्य एकमेकांना पाण्यात पाहुन एकमेकाविषयी द्वेष बाळगत होते. याच परिस्थितीचा फायदा घेऊन घोरीने पंजाब व सिंधच्या प्रदेशावर स्वाऱ्या करून तो प्रदेश जिंकला व दिल्ली वर आक्रमण करण्याची योजना आखली त्यातुनच इ.स. ११९१ मध्ये दिल्ली किंवा इंद्रप्रस्थचा राजपुतराजा पृथ्वीराज चौहाण आणि मुहम्मद घोरी यांच्यात स्थानेश्वरजवळील तराईनच्या भूमीवर पहिली लढाई झाली. या लढाईत महम्मद घोरीचा पराभव झाला. पृथ्वीराज चौहाणने घोरीला माफ केले व सोडुन दिले. परंतू घोरी आपला पराभव विसरू शकला नाही. त्याने आपल्या पराभवाची कारणे शोधली पुन्हा सैन्याची जमवाजमव केली. तसेच शत्रुची कमकुवत बाजू हेरली आणि सर्वशक्तिनिशी इ.स. ११९२ मध्ये तराईनच्याच भुमिवर घोरी आणि पृथ्वीराज चौहाण यांच्या सैन्यात घनघोर लढाई झाली. या लढाईत घोरीकडून पृथ्वीराज चौहाण चा दारून पराभव झाला आणि खऱ्या अर्थाने येथेच भारताच्या राजकीय इतिहासाला कलाटणी मिळाली. दिल्लीवर घोरीचे वर्चस्व निर्माण झाले. परंतु कन्नोज चा राजपुत राजा जयचंद्र राठोर चे अस्तित्त्व जो पर्यंत उत्तर भारतात आहे तो पर्यंत महम्मद घोरी आणि त्यांचा गुलाम कतुबुद्दिन ऐबक यांना स्थिरता मिळणार नव्हती म्हणून इ.स. ११९३ मध्ये घोरीने जयचंद्र राठोरचा पराभव केला आणि दिल्लीच्या आसपासचा प्रदेश कुतुबुद्दिन ऐबककडे सोपवुन तो आपल्या मायदेशी परत गेला. सिंध प्रांतातील गख्खर लोकांच्या विद्रोहामुळे तो भारतात परत आला या लोकांचे दमण करून परत जात असताना. इ.स. १२०६ मध्ये तो ठार झाला त्याच वेळी आपल्या स्वकतृत्वाने आणि मुत्सद्देगिरीने कुतुबुद्दिन ऐबकने दिल्लीवर आपले वर्चस्व स्थापन करून. इ.स. १२०६ मध्ये भारतात सुलतानशाहीची म्हणजेच मुस्लीम सत्तेची स्थापना केली.

कुतुबुद्दिन हा महम्मद घोरीचा गुलाम होता. त्यानंतर दिल्लीच्या सत्तेवर आलेला अल्तमश हा कुतुबुद्दिन ऐबकचा गुलाम होता आणि अल्तमशची मूलगी रझिया नंतर सत्तेवर आलेला बल्बन हा अल्तमशचा गुलाम होता. म्हणुन दिल्ली सुलतान शाहीचे प्रारंभिचे घराणे गुलाम घराणे म्हणुन ओळखले जाते. गुलाम घराण्याचा शेवटचा सुलतान बल्बनचे उत्तर अधिकारी दुर्बल निघाले याचाच फायदा रियासुद्दिन खिलजी याने घेऊन दिल्लीवर खिलजी घराण्याची सत्ता स्थापन केली. या घराण्यात अल्लाउद्दिन खिलजी हा पराक्रमी व शुर सुलतान होऊन गेला तोच दक्षिण भारतात येणारा पहिला सुलतान ठरतो अल्लाउद्दिन नंतर त्यांचे उत्तर अधिकारी दुर्बल व अकार्यक्षम निघाले. याचाच फायदा रियासुद्दिन यांनी घेऊन दिल्लीवर तुघलक घराण्याची सत्ता स्थापन केली. या घराण्यात महम्मद बिन तुघलकाच्या रूपाने कतृत्त्ववान व सुधारणावादी सुलतान दिल्लीच्या सत्तेला लाभला परंतु त्यांनी केलेले सर्व प्रयोग अपयशी झाले. त्यानंतर फिरोजशाहा तुघलकनंतरचे तुघलक सुलतान अत्यंत बलहीन नाकर्ते निघाले या कालावधित तैमुरलंगाचे आक्रमण भारतावर झाले. त्यामुळे तुघलक घराण्यातील दुर्बल सुलतानाला बाजूला सारून तैमुरचा सरदार सय्यद खिज्रखान

याने इ.स. १४१४ मध्ये दिल्लीवर सय्यद घराण्याची स्थापना केली. सय्यद घराण्याच्या सुलतानाच्या इ.स. १४५१ मध्ये बहलोल लोदीने बाजूला सारून दिल्लीवर लोदी घराण्याची सत्ता केली. या लोदी घराण्याने इ.स. १५२६ पर्यंत दिल्ली सुलतानशाहीचा राज्यकारभार केला. लोदी घराण्याचा शेवटचा सुलतान इब्राहिम लोदी ठरला. कारण काबुल समरकंदचा मुगल बादशाहा बाबर याने इ.स. १५२६ मध्ये पानिपतच्या पहिल्या लढाईत इब्राहिम लोदीचा पराभव करून मुघल घराण्याची सत्ता स्थापन केली. अशा पद्धतीने दिल्ली सुलतानशाहिचा शेवट झाला.

प्रस्तुत घटकामध्ये महम्मद घोरीच्या आक्रमनापासून गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे आणि सय्यद व लोदी घराण्याचा संक्षिप्त अभ्यास करणार आहोत.

## २.१ उद्दिष्ट्ये

१) महम्मद घोरीने भारतावर केलेल्या विविध आक्रमनाची माहिती घेता येईल. तसेच भारतात मुस्लीम सत्तेच्या स्थापने विषयी माहिती मिळवता येईल.

२) गुलाम घराण्यातील सुलतान कुतुबुद्दिन ऐबक, रझिया सुलतान, बल्बन यांच्या राजकीय कारकिर्दी विषयी माहिती मिळवता येईल.

३) खिलजी घराण्यातील सुलतान गियासुद्दीन खिलजी व अल्लाउद्दिन खिलजीच्या कारकिर्दीची माहिती उपलब्ध होईल.

४) सुलतान गियासुदिन तुघलक व मुहम्मद –बिन–तुघलक अंतर्गत व परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करता येईल.

५) सय्यद आणि लेदी घराण्याची माहिती घेता येईल.

६) दिल्ली सुलतानशाहीच्या ऱ्हासाची कारणे स्पष्ट करता येतील.

## २.२ मंहमद घोरीचे भारतावरील आक्रमण, (गुलाम घराणे)

महमंद घोरीचे आक्रमण हे भारतावरील मुस्लिमांचे पहिले आक्रमणे नसुन त्या पूर्वी मुहम्मद–बिन–कासिमने इ.स. ७११ मध्ये आक्रमण केले त्यानंतर महम्मद गझणी ने इ.स. १००० ते १०२७ या कालावधीत एकूण सतरा स्वाऱ्या केल्या. गझणीच्या महम्मदाचा भरतावर आक्रमण करण्याचा उद्देश हा या ठिकाणी आपली सत्ता स्थापन करण्याचा नसुन केवळ आर्थिक लुटमार करून संपत्ती मिळविणे हा होता. गझणी च्या महमदा नंतर जवळपास दिडशे वर्षांनी शहाबुद्दिन महमंद घोरी ने इ.स. ११७५ ते इ.स. १२०६ या कालावधीत भारतावर अनेक आक्रमणे केले आणि भारतावर आपले वर्चस्व स्थापन केले. त्यामुळेच पुढील काळात घोरीचा गुलाम कुतुबुद्दिन ऐबक यांनी इ.स. १२०६ मध्ये भारतात मुस्लीम सत्तेची स्थापना केली.

इ.स. ११७५ मध्ये शहाबुद्दिन मोहमद घोरीने भारताच्या मूलतान, कच्छ या प्रदेशावर प्रथम आक्रमण केले आणि तो प्रदेश त्याने काबीज केला. इ.स. ११७८ मध्ये गुजरातच्या सोळंकी राज्यावर आक्रमण केले. परंतु येथील कर्तबगार शासक राजाभीमदेवाने घोरीचा दारून पराभव केला. त्यामुळे घोरी हा आपले राज्य गझणीकडे पळाला. परंतु घोरीने आपली हार मानुन खचुन न जाता परंत भारतावर आक्रमण करण्याची तयारी केली आणि इ.स. ११८० मध्ये पंजाबची राजधानी पेशावर जिंकून असापासच्या प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले. तसेच सिंधच्या प्रांतावरही विजय मिळवला. त्यास पुढे साम्राज्यविस्तार करण्यासाठी राजपुताशी लढा द्यावा लागणार होता.पुढे घोरीने आपला मोर्चा दिल्लीकडे वळविला त्यातुनच तराईनच्या दोन युद्ध घडुन आले.

**अ) तराईनची पहिली लढाई (इ.स. ११९१):** दिल्ली (इंद्रप्रथ) आणि आजमेर च्या प्रदेशावर त्यावेळी चौव्हाण घराण्यातील महापराक्रमी राजा पृथ्वीराज तिसरा हा राज्यकरीत होता. इ.स. ११८९ मध्ये मंहमद घोरीने चव्हाण घराण्याच्या ताब्यातील भटींडा हे ठाणे जिंकुन चौव्हाण साम्राज्याला धक्का दिला होता. त्यामुळे घोरीला धडा शिकविण्यासाठी पृथ्वीराज चौहाणने आपला भाऊ गोंविदराज यास सोबत घेऊन भटिंडयाकडे निघाला स्थानेश्वर जवळील तराईन च्या भुमिवर महमद घोरी आणि पृथ्वीराज चौहाण यांचे सैन्य समोरासमोर आले याच ठिकाणी इ.स. ११९१ मध्ये घनघोर लढाई झाली या लढाईत महमद घोरीचा दारून पराभव झाला भारताच्या तत्कालीन इतिहासातील परकिय आक्रमकास धडा शिकविणारा हा पहिला मोठा विजय ठरला या लढाईनंतर महाप्रतापी राजा पृथ्वीराज चौहाणने मोठ्या उदार मनाने घोरीला माफ करून सोडून दिले.

**आ)तराईनची दुसरी लढाई (इ.स. ११९२):** ज्या लढाईने भारताच्या इतिहासाला कलाटनी मिळाली ती लढाई होय. पहिल्या लढाईत आपला झालेला पराभव घोरी विसरू शकला नाही. म्हणजे इ.स. ११९२ ची तराईन ची दुसरी लढाई प्रथम पराभवाचे कारणे शोधली दोषी सेनाअधिकारी व सैनिकांना कठोर शिक्षा केल्या व गझणीला जाऊन त्याने पुन्हा सैन्यांची जमवाजमव केली आणि पृथ्वीराज चौहाणाचा पराभव करण्याची प्रतिक्षा केली पृथ्वीराज यांच्या कमकुवत बाजूचा अभ्यास केला आणि सर्व तयारिनीशी पुन्हा ससैन्य भारतातील तराईनच्या युद्धभूमीवर येऊन दाखल झाला. राजा पृथ्वीराजने घोरीचा पहिल्या लढाईत पराभव केला होता. त्यामुळे आपण घोरीला सहज पराभूत करू असे त्यांना वाटले या संदर्भात फरिश्ता म्हणतो राजपुतांच्या सैन्यात पाचलाख घोडे, तीन हजार हत्ती होते आणि मोठ्या संख्येने पायदळ होते. तसेच १५० राजपुत राजे एकत्र आले होते. हे मत खरे वाटत नाही कारण राजपुत राजे एकमेकांना पाण्यात पाहत होते. एकमेकांचा द्वेष करीत होते आणि राजा पृथ्वीराज महाप्रतापी असुन त्यांच्या सोबत राजपुतांची एवढीमोठी फौज असेल तर राजपुतांचा पराभव होणार तरी कसा? तराईनच्या युद्धभुमिवर घोरीने अत्यंत चाणाक्ष पद्धतीने पृथ्वीराज चौहाणच्या सैन्याना चारही बाजूनी घेरले तसेच कांही राखीव सैन्य ठेवले होते. प्रत्यक्ष लढाईला प्रारंभ झाला त्यावेळी सुरुवातीला राजपुताना यश मिळत होते. परंतु घोरीने ज्यावेळी राखीव ठेवलेले ताज्या दमाचे सैन्य युद्धात आनले त्यावेळी लढाईचे स्वरूप बदलले. पृथ्वीराज चौहाण सैन्यामध्ये घुसुन लढत होता हजारो सैन्याना त्यांनी ठार केले. परंतु अचानक तो शत्रुच्या जाळयात पडुन पकडला गेला त्यावेळी क्षणाचाही विलंब न करता मंहमद घोरीने त्यास ठार केले. राज ठार होताच राजपुतांच्या सैन्यांची दाणादाण उडाली. उत्तर भारतीय राजपुत हे भारत भुमीच्या संरक्षणाचे कवच मानले जात होते. त्या राजपुतांचा तराईनच्या दुसऱ्या लढाईत दारून पराभव झाला आणि घोरीची निर्वीवाद पणे दिल्लीवर सत्ता स्थापन करण्याचा मार्ग खुला झाला.

**महमंद घोरीने मिळविलेले इतर विजय:** तराईनच्या दुसऱ्या लढाईतील राजा पृथ्वीराज चौहाणचा झालेला पराभव हा घोरीच्या जीवनातील सर्वात मोठा विजय होता आणि भारतीय राजपुताचा सर्वात मोठा पराभव होता. घोरीने लागलीच दिल्लीवर आपले वर्चेस्व स्थापन करून आपला कर्तबगार गुलाम सरदार कुतुबुदिद्दन ऐबक यास दिल्लीचा राज्यपाल बनविले. तसेच आपला मोर्चा अजमेरकडे वळविला. तेथे चव्हाण वंशातील हरीराज राज्य करीत होता. कुतुबुद्दिन ऐबक ने अजमेरच्या किल्याला वेढा देऊन पाणी व रसद पुरवठा बंद केला त्यामुळे हरीराजला पराभवाशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

**ई) कन्नोज चे युद्ध इ.स. ११९४:** कन्नोजवर गड्डवाल वंशातील कर्तृत्ववान राजा जयचंद्र राठोड राज्य करीत होता. तो पृथ्वीराज चौहाणचा सासरा असून देखील कट्टर विरोधक आणि पराकोटीचा द्वेष करणारा होता. तराईनच्या लढाईत पृथ्वीराज चौहाणचा पराभव झाल्यामुळे सर्वाधिक आनंद जयचंद राठोरला झाला होता. एवढेच नाही तर तो दिल्ली आपल्या ताब्यात घेण्याचे स्वप्न पाहु लागला. जो पर्यत उत्तर भारतात जयचंद्र राठोर जिवंत आहे. तोपर्यत आपल्याला स्थिरता मिळणार नाही. असे घोरीला कळुन चुकले होते. त्यास प्रति उत्तर देण्यासाठी जयचंद राठोड सज्ज झाला आणि चंद्रावरच्या मैदानावर लढाईना सुरुवात झाली जयचंद्र हा पारंपरिक पद्धतीने लढत होता. तरी पण विजयाच्या मार्गावर होता. अशा परिस्थितीत अचानक तुर्की सैन्याचा एक बान जयचंद्र राठोरच्या डोळयात आरपार घुसला आणि तो घायाळ होऊन हत्तीवरील अंबारितुन खाली कोसळला आपला राजा दिसत नाही हे पाहुन राजपुत सैन्याची धांदल उडाली व सैन्य जिव वाचविण्यासाठी सैरावैरा पळु लागले. या लढाईत पुन्हा घोरीला राजपुता विरूद्ध मोठा विजय मिळाला. घोरीने जवळपास १४००० उटांवर संपत्ती लादून ती गझणीला नेली.

पृथ्वीराज चौहाण आणि नंतर जयचंद राठोड यांच्या पराभवामुळे उत्तर भारतातील राजपुत शक्तीला प्रचंड हादरा बसला. त्यामुळे बयाण, ग्वालेर सारख्या राजपुत शासकानी युद्ध न करताच तुर्की सैन्यापुढे शरणागती पत्करली. पुढे तुर्क सैन्याना लगाम घालण्यासाठी राजपुतानी त्रीसंघ तयार केला परंतु या संघाला देखील घोरी ऐबकच्या सैन्याकडून पराभुत व्हावे लागले. घोरीची विजयी घोडदौड सुरूच राहिली कारण त्याना जसा जसा विजय मिळत गेला तस तसा त्यांचा आत्मविश्वास वाढला. इ.स. १२०२ मध्ये बुंदेल खंडातील चंदेलाचे राज्य घोरीने जिंकले त्यानंतर आपले लक्ष बौद्ध धर्मीय अनुयायांचे मुख्य केंद्र असलेल्या बिहार प्रांताकडे वळविले. या ठिकाणी अंहिसावादी इन्दुमन या राजाने घोरीचा सेनापती इख्तियार—बिन—बख्तियार खिलजी यांच्या पुढे शरणागती पत्करली. याच ठिकाणी बौद्ध धर्माच्या अभ्यासाचे मुख्य केंद्र असलेल्या नालंदा आणि विक्रमशिला या विद्यापीठावर सैन्यानी हल्ला करून विद्यापीठे पूर्ण नष्ट करून टाकले. इ.स. १२०५ मध्ये घोरीचा सेनापतीने बंगालवर आपले वर्चस्व स्थापन केले. तेथे सेन वंशाचा राजा लक्ष्मण सेन हा राज्य करीत होता. त्यानी तुर्कापुढे लागलीच शरणागती पत्करली.

**उ) महंमद घोरीचा मृत्यू** : जवळपास संपूर्ण उत्तर भारतावर विजय मिळवुन वेगवेगळया प्रांतावर आपल्या चार सुभेदारांना नियुक्त करुन घोरी प्रचंड संपत्ती घेऊन मायदेशी परतला. पंजाब आणि आसापासच्या सिमावर्ती भागात गख्खर ही आक्रमक जमात होती. घोरीच्या सैन्याच्या विरोधात त्यानी सतत विद्रोह सुरू ठेवला होता. तुर्काचे आपल्या वरील लक्ष विचलीत करण्यासाठी त्यांनी घोरीच्या मृत्यूची अफवा पसरून दिली त्यामुळे तुर्क सरदारानी सत्तेसाठी बंड सुरू केले याचा फायदा गख्खरांनी करून घेतला आणि विद्रोह केला. या गख्खरांना एकदाचा धडा शिकविण्यासाठी घोरी गझणी वरून तर ऐबक दिल्लीवरून चिनाब नदिच्या खोऱ्यात आले या ठिकाणी घोरीची छावणी होती. रात्रीच्या वेळी अचानक गख्खरांनी घोरीवर हल्ला केला त्यात १५ मार्च १२०६ रोजी घोरीचा मृत्यू झाला.

**१.१.१ कुतुबुदिन ऐबक:** गझनी चा सुलतान महमद घोरी यांनी भारतामध्ये सत्ता स्थापन करण्याच्या उद्देशाने अनेक स्वाऱ्या केल्या व भारताच्या अनेक प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले. परंतु तो भारतातील मुस्लीम सत्तेचा संस्थापक ठरत नाही कारण महमद घोरिच्या मृत्यूनंतर त्याचा गुलाम व दिल्लीचा राज्यपाल कुतुबुदिन ऐबक याने २४ जुन १२०६ मध्ये स्वतःच राज्यभिषेक करून दिल्ली येथे स्वतंत्र मुस्लीम सत्तेची स्थापना केली. तो महमद घोरिचा गुलाम

असल्यामुळे त्यांचे घराणे हे गुलाम घराणे या नावाने इतिहासात ओळखले जाते. या गुलाम घराण्याने इ.स. १२०६ ते इ.स. १२९० असे ८४ वर्ष दिल्लीच्या राजसिंहासनावरून राज्यकारभार केला. भारतात दिल्ली येथे मुस्लीम सत्तेची स्थापना करून ऐबक ने स्वतःला सुलतान म्हणुन घोषित केल्यामुळे तोच दिल्ली सुलतानशाहिचा संस्थापक ठरतो ऐबक नंतर त्याचा गुलाम अल्तमश हा राजपदावर आला त्यांनंतर अल्तमशचा गुलाम बल्बन हा राजपदावर आला त्यामुळेच हे घराणे गुलाम घराणे म्हणुन ओळखले जाते. या घराण्यातील पहिला सुलतान गुलाम कुतुबुदिन ऐबक च्या कारकिर्दीविषयी पुढील प्रमाणे माहिती पाहता येते.

**अ) कुतुबुदिनचे पूर्वायुष्य:** महमद घोरीचे भारतात प्रमुख चार गुलाम होते त्यापैकी एक हुशार बुद्धीमान प्रमाणिक व कर्तबगार गुलाम म्हणुन ऐबक ओळखला जातो. त्यांचा जन्म तूर्कस्थान मध्ये ऐबक घराण्यात झाला. ऐबकला लहानपणी घरातुन पळुन नेऊन निशापुरच्या बाजारात विकले, एका काझीने त्यास विकत घेतले व आपल्या पुत्रा प्रमाणे वागणुक देऊन शिक्षण दिले. काझीच्या मृत्यूनंतर त्यांच्या मूल्लांनी ऐबकला एका श्रीमंत व्यापाऱ्यास विकले. त्या व्यापाऱ्याने महमद घोरीला विकले. ऐबक दिसण्यास कुरुप असला तरी युद्ध कलेत निपुन, हुशार आणि बुद्धीमान होता. त्यामुळे तो घोरीचा आवडता प्रिय गुलाम बनला घोरीने त्यास अमिर–ए–आखुर हे पद दिले. घोरीन हिन्दुस्थना वरील अनेक आक्रमणाच्या वेळी हा घोरीचा उजवा हात म्हणुन कार्य करीत होता. त्यांने तराईनच्या पहिल्या व दुसऱ्या लढाईत मोठा पराक्रम गाजविला. त्यामुळेच घोरी परत जाताना भारतात जिंकलेल्या प्रदेशाचा प्रमुख म्हणुन ऐबकची नेमणुक केली.

**आ) दिलीच्या सुलतानपदी ऐबक:** महमद घोरी चे प्रमुख चार सरदार होते त्यापैकी कुतुबुदिन ऐबक हा विश्वासू सरदार होता. तसेच घोरीच्या काळात ऐबकने केलेल कार्य लक्षात घेउन घोरीच्या मृत्यूची बातमी समजताच लाहोरच्या जनतेनी गुलाम ऐबकची घोरीच उत्तर अधिकारी म्हणुन घोषणा केली. २५ जुन १२०६ मध्ये ऐबकने लाहोरला पोहचून तेथील सत्ता स्विकारली व स्वतःला सुलतान म्हणुन घोषित केले. याच कालावधीत गझनी या ठिकानी ताजुद्दिन यल्दोज, बंगाल–बिहार येथे बख्तियार खिलजी तर मूलतानमध्ये नासिरोदिन कुबाचा यांनी आपआपल्या प्रांतात स्वतःला स्वतंत्र घोषित केले. सर्व परिस्थिती लक्षात घेऊन ऐबकने स्वतःला दिल्लीचा सुलतान म्हणुन घोषित केले असले तरी दिल्लीच्या सिंहासनावर न बसता इ.स. १२०६ ते इ.स. १२०८ या कालावधित सिपहसालार (सुलतानाचा सेवक) म्हणुन काम केले.

**इ) ऐबक समोरिल समस्या व त्यांचे निराकरण:** महमद घोरीला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या साम्राज्यात ठिकठिकाणी उठाव झाले ऐबकने दिल्ली सुलतानशहीचे सूत्र हाती घेतले परंतु त्याच्या समोर खुप मोठ्या समस्या होत्या घोरीच्या ठरलेल्या प्रमुख तीनही सुभेदारानी आपआपल्या प्रदेशात स्वतंत्र घोषित करून स्वतःस सुलतान समजु लागले. हेच ऐबक पुढे खुप मोठे आव्हान होते. अत्यंत चाणक्ष पद्धतीने ऐबकने गझणीच्या ताजुद्दीन एल्दोजच्या कन्येशी स्वतःचा विवाह केला. आपल्या बहीनीचे लग्न मूलतान प्रांतात स्वतंत्र घोषित केलेल्या नासिरूद्दिन कुबेचासी लग्न लावून दिले. स्वतःच्या कन्येचा विवाह अत्यंत शुर आणि कर्तबगार आसणारा आपला गुलाम अल्तमशसी लाऊन दिला. तर बंगालवर वर्चस्व स्थापन केलेल्या इखितियार बिन बख्तियार खिलजीच्या मृत्यूनंतर बंगालच्या भुमीला देखील आपल्या प्रभावाखाली आणले त्या बरोबरच उत्तर भारतातील हिन्दु राजपुत राजपुत्रांनी घोरीच्या मृत्यू नंतर आपले गेलेले प्रदेश, राज्य परत

मिळविण्यासाठी सतत विद्रोह केले ऐबकने आपल्या समोरील सर्व आक्रानावर व्यवस्थितरित्या मात केली.

**ई) कुतुबुदिन ऐबक चे मुल्यमापन:** कुतुबुदिन ऐबक हा एक बुद्धिमान शूर साहसी व धाडसी होता. त्यांच्या अंगी राज्यकर्त्याचे सर्व गुण होते. घोरीने मृत्यू पूर्वी दिल्ली, अजमेर आणि परिसराचा सर्वेसर्वा आणि आपला उत्तर अधिकारी म्हणुन नेमणुक दिली असताना देखल सुलतान घोरीच्या मृत्यूनंतर स्वत:ला सुलतान म्हणुन घोषित करण्याची घाई केली नाही. तर सुलतानाचा सेवक म्हणुन सत्तेचे सर्व सूत्रे हाती घेतले ऐबक हा दिसायला अत्यंत कुरुप होता. परंतु त्यांच्या अंगी असलेल्या चांगल्या गुणामुळे घोरीने त्यास गुलामगिरीतुन मुक्त करून स्वतंत्र केले. एवढेच नाही तर आपली स्वत:ची मूलगी त्यास देऊन जावई बनविले. घोरीच्या सर्व गुलाम आणि सुभेदार सरदारांमध्ये ऐबक हा प्रिय आणि एकनिष्ठ सेवक होता. त्याच बरोबर ऐबक हा मोठा दानशुर होता. त्यामुळे त्यास 'लाखबक्ष' या नावाने ओळखले जाते. ऐबकची महानता किंवा मोठेपण त्यांनी युद्धात गाजविलेल्या पराक्रमात किंवा भारतात जिंकलेल्या प्रदेशात नसुन त्यांनी भारतात इ.स. १२०६ मध्ये मुस्लीम सत्तेची स्थापना केली यात आहे. म्हणुनच तो भारतातील मुस्लीम सत्तेचा सुलतानशाहीचा तसेच गुलाम घराण्याचा संस्थापक ठरतो.

**२.१.२ सुलतान शमसुद्दीन अल्तमश:** गुलाम घराण्याचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक चा मृत्यू इ.स. १२१० मध्ये झाला. त्यांचा उत्तर अधिकारी म्हणुन आरामशहा याने आठ महिने दिल्लीचा सुलतान म्हणुन कारभार केला. परंतु त्याच्या अंगी राज्यकर्त्याचे कोणतेच गुण नव्हते त्यामुळे दिल्लीच्या जनतेनी आणि प्रमुख सरदारानी ऐबकचा जावाई (गुलाम) शमसुदीन अल्तमश यास दिल्लीची सत्ता घेण्यासाठी निमंत्रीत केले. त्यानुसार दिल्ली जवळील 'जड' येथे सुलतान आरामशहाचा पराभव करून इ.स. १२११ मध्ये दिल्लीचे सिहासन प्राप्त करून अल्तमशने स्वत:स सुलतान म्हणुन घोषित केले.

**अ) शम्सुद्दीन अल्तमशचे पुर्वचरित्र:** अल्तमश यांचे पूर्वज मुळचे तुर्कस्थानचे होते. अल्तमशचा जन्म हा तुर्कस्थानमध्येच झाला होता. पित्याचे नाव ईलम खाँ होते त्यांना चार पुत्र होते. त्यापैकी एक म्हणजे अल्तमश होय. हा लहानपणापासून हुशार शरिरयष्टी चांगली दिसण्यासाठी सुंदर त्यामुळे इतर भाऊ त्याचा द्वेष आणि इर्षा करत होते. पित्याच्या मृत्यूनंतर त्याच्या इतर भावानी मिळुन अल्तमश यांना माणसांच्या खरेदी विक्री बाजारात बुखारा येथे जमालुद्दिन नावाच्या व्यापाऱ्यास विकले या व्यापाऱ्यापासून ऐबकचे अल्तमश ला खरेदी केले. अल्तमश दिसण्यासाठी जसा सुदंर होता. त्याच पद्धतीने शिक्षण आणि युद्ध कलेत निपुण होता. त्याने अल्पावधित आपल्या पराक्रमाची चुनुक आपल्या स्वामीला दाखवुन दिली. त्यामुळै ऐबकने त्याची गुलामगीरीतुन मुक्तता करून सैन्यातील अमिर–ए–शिकार हे पद दिले. ऐवढेच नाही तर आपल्या कन्येचा विवाह त्याच्याशी लाऊन त्यास जावाई आणि बदायुँचा राज्यपाल बनविले.

सुलतान ऐबकच्या मृत्यूनंतर राज्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली या परिस्थितीत बाहेर काढण्याची क्षमता दिल्लीच्या सरदाराने केवळ अल्तमश मध्ये आहे असे वाटले. त्यांनी दिल्लीची सत्ता अल्तमशला घेण्याची विनंती केली. सर्व परिस्थितीवर मात करून अल्तमशने इ.स. १२११ मध्ये आरामशाह यास सिंहासनावरून बाजूला सारून दिल्लीची सत्ता हाती घेतली.

**आ) सुल्तान अल्तमश समोरिल अडचणी:** अल्तमश ने दिल्लीचे राजसिंहासन तर प्राप्त केले, परंतु त्यांच्यासमोर खुप मोठ्या समस्या होत्या त्यात प्रमुख म्हणजे तो गुलाम होता. इस्लाम धर्मात गुलामाला वारसा अमान्य होता. त्यामुळे काही कट्टर इस्लाम पंथियांनी त्यास सुल्तान म्हणुन अमान्य केले. तसेच तुर्की सरदार व अमीरानी अल्तमश हा ऐबकचा उत्तराधिकारी होऊ शकत नाही म्हणुन विरोध केला. तत्कालीन गझनीचा सुलतान ताजुदिन याल्दोजने ने अल्तमशने सुलतान म्हणुन दिल्लीची सत्ता हाती न घेता गझणीचा सुभेदार म्हणुन काम करावे असे आव्हान केले. नासिरूद्दीन कुबाचाने मूलतान आणि सिंधमध्ये स्वत:ला स्वतंत्र घोषित केले व दिल्लीच्या सिंहासनावर स्वत:चा दावा केला. कारण तो देखील ऐबकचा मेव्हना होता. बंगालमध्ये अलिमदानखानाने स्वत:स स्वतंत्र घोषित केले. तसेच मध्य आशियाच्या सिमेला क्रुर आक्रमक जमात असणाऱ्या मंगोलाच्या स्वाऱ्या सुरू झाल्या, उत्तरेतील अनेक हिन्दु राजपुत राजपुत्रांनी आरामशहाच्या काळात स्वत:ला स्वतंत्र घोषित केले होते. उत्तरेच्या काही भागात गख्खरांनी धुमाकुळ घातलेला होता. अल्तमशला दिल्लीचे सिंहासन तर मिळाले पण त्याच्या समोर पहाडासारख्या समस्या उभ्या होत्या. पूर्वीचा सुलतान आणि मुस्लीम सत्तेचा संस्थापक ऐबक यांनी सुलतानशाही स्थापन केली पण प्रशासन व्यवस्था तो निर्माण करु शकला नाही. सुलतान अल्तमश यांने आपल्या राज्यात प्रशासन व्यवस्था निर्माण करून सर्व समस्यांवर मात केली व इ.स. १२३६ पर्यंत दिल्लीचा सुलतान म्हणुन राज्य कारभार केला.

**इ) सुलतान अल्तमशची कामगीरी**

**१) कुतुबी अंमिरांचा बंदोबस्त:** कुतुबी अमिर आणि सरदार हे ऐबकच्या वंशातील असल्याचे सांगुन दिल्लीच्या सुलतान पदी विराजमान झालेल्या अल्तमशला विरोध करण्यास सुरुवात केली. कुतुबी अमीराना कट्टर इस्लामी लोकांनी पाठिंबा दिला या सर्वांचा बंदोबस्त करण्यासाठी अल्तमशने तीन तत्त्वांचा अवलंब केला. अनेक अमीरांना संपत्तीचे अमिष देऊन विकत घेतले काही सरदाराना दरबारात मानाच्या जागा दिल्या जे अमिर व सरदार हे विरोधक हे दोन्ही करण्यास तयार नव्हते. त्यांना गुप्त पद्धतीने पकडुन ठार केले.

**२) चाळीस गुलामांच्या संघाची स्थापना :** सुलतान अल्तमश यांनी आपल्या समोरील अंतर्गत आणि बाह्य अडचणीवर मात करण्यासाठी व साम्राज्यावर मजबुत पकड निर्माण करण्यासाठी आपल्या बौद्धिक कौशल्यातुन अत्यंत उत्कृष्ट आणि सक्षम योजना आखली ती म्हणजे आपल्या सर्व गुलामा मधुन शुर कर्तत्ववान आणि हूशार असे चाळीस गुलाम निवडले आणि त्यांचा एक संघ तयार केला. तोच संघ इतिहासात चालीसगणी तुर्की दल किंवा चालीस गुलांमाचा संघ म्हणुन ओळखला जातो. त्या संघातील गुलामास वैयक्तिक सैन्य बाळगण्याचे अधिकार देऊन वेगवेगळया प्रदेशात त्यांच्या नियुक्त्या केल्या तसेच आपल्या समोरील आव्हाने पेलण्यासाठी चालीसगणी तुर्की दलाचा वापर केला.

**३) ऐबकचा उत्तर अधिकारी म्हणुन सिद्ध केले:** अल्तमश ने आपल्य समोरिल प्रारंभिक अडचणीवर मात करण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद या नितीचा अवलंब केला. आपल्या प्रबळ शत्रुच्या विरोधात ताबडतोब कार्यवाही न करता आपली बाजू भक्कम बनविली. दिल्ली आणि परीसरातील अमिर उमराव सरदार आणि जनतेची मने जिंकली आपल्या अत्यंत विश्वासु गुलामांचा एक संघ निर्माण केला स्व:सामर्थ्य आणि पराक्रमाची जानीव करून देऊन जनतेचा विश्वास संपादन करून कुतुबुदिन ऐबकचा आपणच उत्तर अधिकारी असल्याचे सिद्ध केले.

**४) ताजुद्दिन याल्दोज चा पराभव :** गझणीचा सुलतान ताजुद्दिन याल्दोज चा पराभव ख्वारिझमच्या राज्याने केलेला होता. हा पराभव विसरून आपले सामर्थ्य दाखविण्यासाठी आणि दिल्ली सुलतान अल्तमशला धडा शिकविण्यासाठी एल्दोज गझनीवरून सिंधच्या प्रदेशात आला त्या ठिकाणी त्याचा संघर्ष नासिरूद्दिन कुबाचा यांच्याशी झाला. अल्तमश चे सुदैव त्याचे दोन्ही शत्रु एकमेकांच्या विरूद्ध लढु लागले त्यांच्यात घनघोर लढाई झाली एल्दोजला मोठी शक्ती याच ठिकाणी खर्च करावी लागली आणि या लढाईत एक शत्रु कुब्याचा पराभव झाला. पुढे आपली अर्धवट शक्ती घेऊन एल्दोज दिल्लीच्या दिशेने निघाला स्थानेश्वर जवळील तराईनच्या भुमीवर अल्तमश ने एल्दोजला रोखले आणि याच ठिकाणी तराईनची तिसरी लढाई झाली. या लढाईत एका मोठ्या शत्रुचा अल्तमशने पराभव केला.

**५) बंगालवर वर्चस्व स्थापन केले. :** ऐबकच्या मृत्यूचा फायदा घेऊन तेथील इख्तियार–बिन–बख्तियार खिलजीच्या वंशजानी इ.स. १२११ मध्ये अलिमर्दानची हत्या केली व ऐवज इमामुद्दीन खिलजी यांनी आपली सत्ता स्थापन केली काही काळ अल्तमशला उत्तर–पश्चिम भागाकडे लक्ष दयावे लागेल. तरी पण इ.स. १२२९ पर्यंत अल्तमशने बंगालवर तीन वेळा स्वाऱ्या केल्या तेथील एवज खिलजीने अल्तमशचे वर्चस्व मान्य करून आश्रीत राहण्याचे मान्य केले. ज्यावेळी अल्तमश दिल्लीला पोहचला त्यावेळेस पुन्हा एवजने स्वतःस बंगालचा शासक म्हणून घोषित केले. पुन्हा अल्तमशने आपला पुत्र नासिरूद्दिन मुहम्मद यास बंगालच्या मोहिमेवर पाठविले त्यांने एवजचा पराभव केला; पण अचानक इ.स. १२२९ मध्ये नासिरूद्दिन मुहम्मदचा मृत्यू झाला त्यामुळे अल्तमशने बंगालवर स्वारी करून एवज इमामुद्दिन यास ठार केले आणि बंगाल, बिहारच्या प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले.

**६) सिंध आणि मूलतानवर विजय:** सिंध आणि मूलतानचा शासक नासिरूद्दिन कुबेचा होता. एल्दोजने भारतात प्रवेश करून प्रथम कुबेचा यांचा पराभव केला होता. त्यावेळे कुबेचा पलायन करून पंजाबमध्ये आश्रयास होता. सुलतान अल्तमशने एका दगडात दोन पक्षी मारण्यासाठी मोहीम आखली एकतर मंगोलाचा बंदोबस्त करता येईल तसेच एल्दोज कडुन पराभुत झालेला नासिरूद्दिन कुबेचा याचा सिंध मूलतान आणि लाहोर परिसर जिंकता येईल. यावेळी कुबेचा भक्कर किल्यात आश्रयास होता. अल्तमशच्या सैन्याने किल्याला वेढा दिला व तोफाचा मारा सुरू केला त्यावेळेस घाबरून नासिरूद्दिन कुबेचाने सिंधु नदित उडी घेतली त्यातच त्याचा मृत्यू झाला.

**७) मंगोलाचे आक्रमण परताऊन लावले:** मध्य आशियात मंगोल ही एक आक्रमक, रानटी व क्रुर अशी एक जमात होती. या काळात या जमातीचा नेता चंगेजखान होता. त्याने मध्य आशियातील बल्ख, बोखारा, समरकंद इत्यादी प्रदेशात धुमाकुळ घालुन त्या भागावर आपले वर्चस्व स्थापित केले पुढे मंगोलांनी आपला मोर्चा खारिझमच्या राज्याकडे वळविला तेथील राजा जलालुद्दिन मंगबारी घाबरून राज्य सोडून भारतात आश्रयास आला. त्याचाच पाठलाग करत चंगेजखान भारताच्या सिमेपर्यंत येऊन पोहोंचला मंगबारीने आपला दुत पाठवुन अल्तमशकडे मदतीची विनंती केली पण त्याला मदत करणे म्हणजे मंगोलाचे भारतावर आक्रमण ओढुन घेणे होय. हे लक्षात घेऊन त्यास मदत नाकारली. लागलीच चंगेजखानाने मंगबारीच्या सैन्यावर हल्ला केला. त्या वेळी तो कसाबसा आपला जिव वाचवून सिंधु नदीत पोहुन पळुन गेला. हिन्दुस्थानातील उष्ण हवामान मंगोलाना मानवले नाही. त्यामुळे ते परत गेले. हिंदूस्थानावर मंगोलांच्या रूपाने आलेली आपत्ती अल्तमशच्या शहानपणामुळे टळली.

९) **अल्तमशची योग्यता:** शम्शुद्दिन अल्तमश हा गुलामाचा गुलाम होता. तरी पण पराक्रमाने ऐबकची मर्जी संपादन करून गुलामगीरीतुन आपली सुटका करून घेतली. एवढेच नाही तर ऐबकचा जावाई बनुन रक्ताचे नाते संबंध निर्माण केले व ऐबकच्या आरमशाहा सारख्या दुर्बल वारसदाराचा सत्तेपासून बाजूला सारून दिल्लीचे सिंहासन काबीज केले. सल्तनतला त्या सिंहासनासमोर अनेक आव्हाने होती ती आव्हाने आपल्या बुद्धिच्या आणि मनगटाच्या बळावर पेलले एवढेच नाही तर दिल्ली सल्तनतला खलिफाची मान्यता मिळविली आपल्या सर्व शत्रूचे पानीपत केले. अत्यंत प्रतीकुल परिस्थिती ऐबकचे स्वप्न अल्तमशने पूर्ण केले. म्हणुन अनेक इतिहासकारानी दिल्लीच्या सुलतानशाहीचा खरा संस्थापक अल्तमश असल्याचे मत व्यक्त केले अल्तमशच्या सततच्या अविश्रांत स्वाऱ्या आणि त्या स्वाऱ्याच्या दगदग यामुळे तो आजारी पडला आणि त्याचा इ.स. १२३६ मध्ये मृत्यू झाला.

### १.१.३ रझिया सुलतान (इ.स. १२३६ ते १२४०)

**अ) रझिया सुलतान :** सुलतानशाहीमध्ये दिल्लीच्या राजसिंहासनावर राज्यकारभार करणारी पहिली आणि शेवटची स्त्री सुलतान म्हणजे रझिया सुलतान होय. शम्सुद्दिन अल्तमशची ती कन्या होती. तिने इ.स. १२३६ ते इ.स. १२४० या कालावधित दिल्लीची सुलतान म्हणुन यशस्विपणे राज्यकारभार केला. अल्तमशचा मोठा पुत्र नासिरूद्दिन मोहमद इ.स. १२२९ मध्ये बंगालच्या मोहिमेवर असताना मृत्यू पावला आणि जिवंत असलेली इतर मूले दुर्बल होती. त्यामुळे मृत्यूपूर्वीच अल्तमश ने आपला उत्तर अधिकारी म्हणुन रझीया ला जाहीर केले पण ही एक स्त्री असल्याकारणाने काही कट्टर इस्लामी सरदारानी सुलतान पदावर येण्यास विरोध केला व अल्तमशचा दुसरा पुत्र रूक्नुद्दिन फिरोजशहा यास नियुक्त केले. रझीया बेगम ने रूक्नुद्दिनचा पराभव करून दिल्लीचे सिंहासन काबीज कले व तीन वर्ष सहा महिने सहादिवस राज्य कारभार केला.

**अ) पुर्वचरित्र:** दिल्लीचा सुलतान अल्तमश यांना चार मुले व तीन मुली होत्या त्या पैकी एक मुलगी म्हणजे रझिया होय मोठा मुलगा नासिरूद्दिन मोहम्मदचा मृत्यू बंगालच्या मोहिमेवर असताना झाला. जो अल्तमशचा खरा उत्तर अधिकारी होता. अन्य तीनही मुलाच्या कर्तबगारीवर अल्तमशचा अजिबात विश्वास नव्हता ग्वालियरवर विजय मिळवून परत आल्यावर अल्तमशने आपला उत्तर अधिकारी म्हणून रझियाला घोषित केले. त्यावेळी कट्टर इस्लामी सनातनी याचा जाब विचारता अल्तमश म्हणाला ''माझे पुत्र तारूण्यात भोगविलासात गुंतले आहेत त्यापैकी कोणीही सुलतान होण्याच्या पात्रतेचा नाही ते राज्य कारभार करण्यासाठी असमर्थ आहेत दिल्लीचा सुलतान बनण्यासाठी रझिया शिवाय दुसरी कोणतीही व्यक्ती योग्य ठरणार नाही.

**आ) रझिया चे राज्यरोहन:** सुलतान अल्तमशने आपला वारस अधिकारी म्हणुन रझियाला निवडले असताना देखील दिल्ली दरबारातील सनातनी इस्लामी लोकांनी तसेच अल्तमशची पत्नी शहातुर्कन हिने आपले पुत्र रूक्नउद्दिन फिरोज यास १ मे १२३६ मध्ये दिल्लीचा सुलतान म्हणुन घोषित केले व राज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतले त्यामुळे राज्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. सुलतानाच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन अनेक सरदार व हिन्दु राजपुत्रांनी विद्रोह केले राज्यात अशांतता अराजकता पसरली रझियाने याच संधिचा फायदा घेऊन आपल्या समर्थनातील सरदारांची मदत घेऊन शहातूर्कन व रूक्नुउद्दिनला कैद केले जनता रझियाच्या बाजूने असल्यामुळे रझिया इ.स. १२३६ मध्ये दिल्लीच्या सिहांसनावर सुलतान म्हणुन विराजमान झाली.

**इ) रझिया सुलतानची कामगीरी:** सुलतान अल्तमश यांनी आपला वारस म्हणुन रझियाची घोषणा केली परंतू कट्टर इस्लाम पंथीयांनी, अमीरानी, सरदारांनी विरोध करून रूक्नाउद्दिन फिरोजशाहास सिंहासनावर बसविले. परंतु तो दुर्बल असल्यामुळे राज्यात अराजकता व अशातंता पसरली. अशा परिस्थितीत आपल्या ओजस्वी आणि तेजस्वी वाणीने रझियाने जनतेला सहाय्यता मागीतली तिने उच्च विचार संयमी स्वभाव कर्तबगार व तेजस्वी वाणी मुळे जनता आणि काही प्रामाणिक अमीर सरदार प्रभावीत झाले व त्यांनी रझियास सुलतान पदावर बसविले. रझियाच्या अंगी राज्यकर्त्याचे पूर्ण गुण होते. आपला वडिल अल्तमश सुलतान पदावर विराजमान झाले त्या वेळेस त्याना अनेक संकटे व अडचणिवर मात करावी लागली. त्याच पद्धतीने रझियाच्या समोर देखील अनेक समस्यांचा डोंगर उभा होता. रूक्नुउद्दिनच्या काळात राज्यात गोंधळ निर्माण झाला होता. रझिया सुलतान ही स्त्री असल्याकारणाने अनेक सनातनी व परंपरावादी कट्टर पंथीय मुस्लीम, सुलतान बनल्यावर सुद्धा विरोधकरीत होते, राज्यप्रशासन यंत्रनेत सुधारणा करणे गरजेचे होते. अल्तमशच्या मृत्यूनंतर जी परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीचा फायदा घेऊन अनेक राजपुत हिंदू राजे व राजपुत्र आपले गेलेले राज्य व प्रदेश परत मिळविण्यासाठी विद्रोह करीत होते. प्रांतिय सुभेदार स्वत:स दिल्लीचा सुलतान आणि प्रांताचा सर्वेसर्वा समजत होते. चालीसगनी तुर्की दलातील सरदार आणि अल्तमशचे गुलाम हे स्वत:स अल्तमशचे उत्तर अधिकारी म्हणुन शिरजोरी करीत होते, ते आपल्या मर्जिप्रमाणे दिल्लीच्या सुलतानानी राज्यकारभार करावा असे त्यांना वाटत होते. रझियाचे उर्वरीत भाऊ व संबंधित अमिर उमराव एका महिलेच्या वर्चस्वाखाली काम करणे कमीपणाचे समजत होते. अशा अनेक संकटावर रझिया सुलतानने आपल्या बुद्धिमत्तेने आणि स्वकर्तबगारीने मात केली बंडखोरांना पराभुत केले. सत्तेचे केंद्रीकरण केले. प्रशासनावर नियंत्रत प्रस्थापित करून राज्यात आपला वचक व दरारा निर्माण केला परंतु ही परिस्थिती फारकाळ टिकली नाही. ती महिला असल्यामुळे दरबारात मर्दानी पोशाख घालुन येणे आणि आदेश देणे हे दरबारातील सरदार व अमिराना आवडले नाही. शेवटी रझिया सुलतानवर वेगवेगळे आरोप होऊन पराभुत केले व दिल्ली वरील महिला राज्यकर्ती रझिया सुलतानची सत्ता संपुष्टात आणली.

**ई) रझिया सुलतान च्या पराभवाची कारणे** : सुलतान रझियास आपल्या विरूद्ध कटकारस्थाने रचत असल्याची माहिती होती. परंतु सुलतान रझियास पाठिंब्यामुळे सुलतानपद मिळाले होते. त्यामुळे विरोधक आपले कांही करू शकत नाहीत. कारण तिला स्वत:वर अधिक विश्वास होता. राज्यातील सर्व सुभेदारानी रझियाचे वर्चस्व मान्य केले होते. परंतु ती स्त्री असुन आपल्यावर अधिकार गाजवत आहे. हे मात्र त्यांना आवडत नव्हते. त्यामुळे अमिर उमराव प्रांतीय सरदारांनी सुलतान रझियावर वेगवेगळे आरोप करून कटकारस्थाने रचुन राजनैतीक हत्तेचा आरोप लावुन दिल्लीच्या सुलतान पदावरून दुर केले. सुलतान रझियाच्या पराभवासाठी खालील कारणे कारणीभुत ठरतात.

१) रझिया सुलतान अबिसिनियाचा हब्शी जमालुदिन याकुबसी संबंध
२) रझिया सुलतान एक स्त्री होती.
३) रझिया सुलतानवर राजनैतीक हत्या केल्याचा आरोप
४) रझिया सुलतानचे आक्रमक धोरण
५) गैरतुर्की लोकांना प्रशासनात उच्च पदे
६) शक्तीशाली चालिसगणी तुर्की दल
७) पारंपरिक रितीरिवाजाचा त्याग
८) अल्तमशच्या इतर दुर्बल पुत्रांची महत्वाकांक्षा
९) राजपुत, हिन्दु राज्याचा सतत होणारा विरोध

१०) लष्करी कमकुवतपणा

**उ) रझिया सुलतानची योग्यता:** मध्ययुगीन भारतच्या इतिहासातील दिल्लीच्या राजसिंहासनावरून राज्यकारभार करणारी पहिली आणि शेवटची स्त्री म्हणजे रझिया सुलतान होय. मिनहाजुद्दिन सिराज आपल्या तबकाते–ए–नासरि ग्रंथात रझिया संदर्भात म्हणतो ''सुलतान रझिया एक बुद्धिमान, न्यायप्रिय, दानशुर, विद्वानाची अश्रयदाती, महान सेनानी लोककल्याणकारी प्रश्नांची राजनितीक विशारद आणि महान सम्राज्ञी होती.'' तर एल्फीस्टन रझियांचा गौरव व थोरवी सांगताना लिहीतो ''जर रझिया एक स्त्री नसती तर तिचे नाव भाताच्या महान मुस्लीम सुलतान आणि सम्राटाच्या यादीत चंद्राप्रमाणे चमकत राहिले असते.''

**ब) गियासुद्दिन बल्बन इ.स. १२४६ ते इ.स. १२८७:** मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना सुलतानशाहीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. सुलतानशाहीच्या राजसिंहासनावर प्रारंभी गुलाम घराण्याची सत्ता होती. या घराण्यात तीन श्रेष्ठ सुलतान होऊन गेले. त्या पैकी एक म्हणजे घियासुद्दिन बल्बन होय सुलतान अल्तमश प्रमाणे हा सुद्धा गुलामाचा गुलाम होता अल्तमशचा अत्यंत विश्वासु गुलाम होता. त्यामुळे त्याची नियुक्ती अल्तमशने चालीस तुर्की दलात केलेली होती. तसेच त्यास आपली मूलगी देऊन जावाई बनविले होते. अल्तमशच्या मृत्यूनंतर रझिया सुलतान असताना तिच्या विरूद्ध जे कटकारस्थाने रचले जात होते. त्यात बल्बन देखील सहभागी होता. सुलतान रझियानंतर बहरामशाहा, मसुदशहा हे सत्तेवर आले यांना पदावरून दुर करून अल्तमाशचा नातु नासिरूद्दिन महम्मद यास दिल्लीचे तख्त मिळुन देण्यात बल्बनचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे बल्बनला नासिरूद्दिनच्या काळात मुख्य प्रधान हे पद मिळाले. इ.स. १२४६ ते इ.स. १२६६ या कालावधित बल्बन सुलतानशाहीचा मुख्य प्रधान म्हणुन काम केले तर इ.स. १२६६ ते इ.स. १२८७ या कालावधीत दिल्लीचा सुलतान म्हणुन कामगीरी बजावली व प्रथमच सुलतान पदाला प्रतिष्ठा व मान मिळवुन दिला.

**अ) बल्बनचे पुर्वचरित्र:** बल्बनचे वडिल दहा हाजार परिवाराचे प्रमुख होते या वरून बल्बनचा जन्म एका उच्च परिवारात झाला, असे लक्षात येते. तो अल्तमश प्रमाणे इल्बारी वंशाचा तुर्क होता. लहानपणी तो मध्य आशियात धुकामुळ घातलेल्या. आक्रमक व रानटी मंगोलाच्या हाती सापडला तो युद्ध कैदी दास बनला. पुढे त्याची दासाच्या बाजारात खरेदी विक्री होत गेली बगदाद येथे त्यास ख्वाजा जमालुद्दिन यानी विकत घेतले. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथे आणुन इ.स. १२३२ मध्ये अल्तमशला विकले. बल्बन हा बुद्दिमान, युद्धकलेत निपुन असल्यामुळे अल्तमशने त्यास 'खासबहदार' सुलतानाचा खास सेवक म्हणुन नियुक्त केले त्याच बरोबर चालीस सरदारांच्या संघात नियुक्त करून आपली मूलगी दिली. रझिया सुलतानच्या काळात तो ''अमीर–ए–शिकारशाही'' म्हणून शिकार खाण्याचा प्रमुख होता.

**आ) गियासुद्दिन बल्बनची मुख्यप्रधान म्हणुन कामगिरी:** दिल्लीची सुलतान रझियास सुलतान पदावरून हटविण्यासाठी रचलेल्या कटात बल्बन सहभागी होता. त्यामुळे रझियाच्या पराभवानंतर सुलतान पदावर आलेल्या बहरामशहा याने बल्बनची अमिर–ए–अखुर या पदावर नियुक्ती केली. त्या नंतर आलेल्या मसुदशाहा या सुलतानाने बल्बनला अमिर–ए–हाजीब हे पद दिले. मसुदशाहाला दिल्लीच्या सिंहासनावरून बाजूला करणे व नासिरूद्दिन महम्मदला दिल्लीचे सिंहासन मिळवुन देण्यासाठी बल्बनचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे नासिरूद्दिने त्यास नायब–ए–मुमालिक

उलघुखॉं ही पदवी बहाल केली. दि. १० जुन १२४८ ते फेब्रुवारी १२६६ या कालवधित बल्बनने राज्याचा मुख्य प्रधान म्हणुन कार्य केले. नासिरूद्दिन मोहम्मद यास सुलतान म्हणुन काम करण्यात रस नव्हता त्यामुळे तो नामधारी सुलतान होता या कालावधित देखील राज्याचा खरा सत्ताधिश बल्बनच होता. तरी पण काही सरदारांनी सुलतानचे कान भरवीले की तो सुलतानशाहीला मुठीत ठेऊ पाहत आहे. तसेच तुमच्या सुलतान पदाला धोका आहे. त्यामुळे सुलतान नासिरूद्दिन महम्मदने बल्बनची मुख्य प्रधान पदावरून हकालपट्टी केली. त्यामुळे राज्यात गोंधळ निर्माण झाला. परिस्थितीचे गांभिर्य ओळखून बल्बनला पुन्हा मुख्य पदावर पदनियुक्ती दिली. पुन्हा बल्बन ने सर्व सत्त आपल्या हाती घेऊन आपल्या विश्वासातील लोकांना उच्च पदावर नियुक्त केले आणि पुढील कामगिरी पार पाडली.

१) लाहोर, मूलतान व उच्छल या प्रदेशातील गख्खर या जमातीचा उपद्रव थांबविला व सिंधया प्रतांत शांतता निर्माण केली.
२) पश्चिमेत्तर सिमाची सुरक्षा मजबुत करून परकिय आक्रमकापुढे आव्हान उभे केले.
३) मंगोलानी सिंधच्या प्रदेशावर आक्रमण केले त्या वेळी बल्बन येत आहे ही बातमी समजताच मंगोल सिंध प्रातांतुन पळुन गेले.
४) दोआबच्या प्रदेशात होत असलेली हिन्दुची बंडे, विद्रोह बल्बनने मोडुन काढले.
५) मेवातीच्या प्रदेशात हिन्दु आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी शासकीय कर्मचारी व मुस्लीम व्यापाऱ्याचा शाहीखजाना लुटत होते. त्यामुळे बल्बनने मेवातीच्या भागात हिन्दुची गावेच्या गावे जाळुन टाकली व हजारो हिन्दुना ठार केले.
६) इ.स. १२४८ ते इ.स. १२५८ पर्यंत राजपुतांना जिंकण्यासाठी बल्बनने अनेक मोहीमा हाती घेतल्या व तो हिन्दु लोकांच्या हत्या शिवाय काहीच करू शकला नाही.

**इ) सुलतान म्हणुन गियासुद्दिन बल्बनची कामगिरी:** दिल्लीची सुलतान नासिरूद्दिन महम्मद हा फेब्रुवारी १२६६ मध्ये मृत्यू पावला तो निपुत्रीक असल्यामुळे त्याने आपल्या मृत्यूपूर्वीच बल्बन यास आपल्या राज्याचा वारस अधिकारी म्हणुन नेमले होते. बल्बनने लागलीच दिल्लीचे सिंहासन प्राप्त केले व स्वतःस घियासुद्दिन बल्बन ही उपाधी घेतली. इ.स. १२६६ ते इ.स. १२८७ या कालावधित दिल्लीचा सुलतान म्हणून कामगिरी बजावली त्यांनी आपल्या समोरील अडचणीवर मात करण्यासाठी **रक्त आणि लोह** या नितीचा अंगीकार केला. जी कामे त्यांना प्रधान म्हणुन करता आली नाहीत ती कामे दिल्लीचा सुलतान म्हणुन पार पाडली त्यांच्या सुलतान म्हणुन कामगिरीचा आढावा पुढील प्रमाणे येईल.

**ई) सुलतान बल्बन समोरील अडचणी**: अल्तमश नंतर दिल्ली सल्तनत वर आलेले सुलतान रझिया सोडली तर सर्व दुर्बल होते. त्यामुळे सुलताना विषयी प्रजा, सरदार व अमरीराच्या मनात भिती, प्रतिष्ठा व आदर तिळमात्र नव्हता. त्यामुळे विद्रोह बंड उद्भवत होते. चालिसगणी तुर्कीतील सरदार स्वतःला सुलतानशाहीचे आधार स्तंभ मानत होते व सुलतानाच्या आदेशाला फारसे मानत नव्हते. अनेक प्रांताचे सुभेदार हे स्वतंत्र प्रवृत्तीने वागत होते. अनेक हिन्दु राज्यांनी स्वतःला स्वतंत्र घोषित केले होते. शासनाची तिजोरी रिकामी होती. मंगोलाच्या आक्रमनाचा धोका कायम होता.

**उ) बल्बनचा दैवी राजसत्तेचा सिंद्धात**: सुलतान पदाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी बल्बनने एका विशिष्ट विचारसरनीचा पुरस्कार केला. तो म्हणजे दैवी राजसत्तेचा सिद्धांत होय. ''राजा हा धरतीवरील ईश्वराचा (आल्ला)प्रतिनिधी असुन त्याचा आदेश म्हणजे धरतीवरील कोणत्याही

मानवनिर्मीत कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे आणि तो आदेश मोडण्याचा अधिकार धरतीवरील कोणत्याही मानवाला नाही.'' आपल दबदबा व दरारा वाढावा म्हणुन बल्बनने कांही उपाययोजना केल्या

१) सुलतानला दैवि अधिष्टान मिळविण्यासाठी सुलतान हा पृथ्वीवरील ईश्वराचा प्रतिनिधी आहे असे सांगितले.
२) स्वत:ला शाही वंशज असल्याचा दावा केला.
३) सुलतानचे सिंहासन भव्य आणि वैभवशाली बनवले.
४) दरबारात हास्य विनोदावर बंदी घातली.
५) सिजदा (वाकुन नमस्कार करणे) पायबोस (पायाचे चुबंन घेणे) हे सक्तीचे केले.
६) उच्च वंशातील लोकांना उच्च पदावर नियुक्त्या दिल्या.

**चाळीस गुलामांच्या संघाचे दमण**: चाळीस तुर्की दलाची स्थापना अल्तमशने केली बल्बनच्या काळापर्यंत त्यांचे इतके वर्चेस्व वाढले की दिल्ली सुलतानाला ते आपल्या ओंजळीने पाणी पाजु लागले. चाळीस तुर्की दलानेच रझियाचा पाडाव केला. बहरामशााहा, मसुदशहाला सुलतान पदावरून हटवीले. प्रशासात त्यांच्या माध्यमातुन लाचलुचपत बेकायदेशिर कृत्य आपआपसातील द्वेष, ईर्षा, हेवेदावे यामुळे राज्यात गोंधळ निर्माण झाला होता. त्यामुळे बल्बने पहिल्या प्रथम बुद्धिचा विलक्षण वापर करून वेगवेगळी कारणे दाखवुन कधी शक्ती तर कधी युक्ती वापरून चालिसगणीदलाचे दमण केले.

**ऊ) अंतर्गत बंडाचा बिमोड व शांतता**: दिल्ली सुलतानशाहीच्या काळात सतत अंतर्गत विद्रोह व बंड होत होते. दोआब आणि दिल्लीच्या परिसरातील आसपासच्या भागात चोर, दरोडेखोर जंगलाचा आश्रय घेऊन आणि दिल्लीच्या आसपासची सर्व जंगले तोडुन टाकली व ठिकठिकाणी लष्कराच्या चौक्या बसविल्या लुटारूच्या प्रमुख केंद्राच्या ठिकाणी आपल्या लष्कराच्या तुकडया ठेवल्या अशा पद्धतीने अंतर्गत बंडाचा बिमोड करून शांतता निर्माण केली.

**ए) बल्बनची इतर कामगीरी**: सुलतान बल्बन हा कृत्वतवान व पराक्रमी होता त्यांनी जवळपास ऐकविस वर्ष दिल्लीचा सुलतान म्हणुन समर्थपणे कामगीरी बजावली. त्यांनी प्रथम राज्याचे सुदृढीकरण केले, कटेहर येथील हिन्दुचे दमण केले. बंगालमधील बंडाचा कायमचा बिमोड केला. मंगोलांच्या आक्रमणाचा बंदोबस्त केला. दिल्ली सुलातानशाहीला प्रतिष्ठ मिळवून दिली. अल्तमशच्या नंतर बल्बनने प्रथमच राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. म्हणुनच डॉ. इश्वरी प्रसाद म्हणतात बल्बन हे एक महान शासक आणि शुर व प्राक्रमी सुलतान होता. त्यांनी आपल्या राज्याचे अपत्तीच्या वेळी संरक्षण केले. इ.स. १२८५ मध्ये मंगोलाच्या आक्रमणाच्या वेळी बल्बनचा मोठा पुत्र मुहोम्मद ठार झाला. या दु:खातुन बल्बन सावरू शकला नाही. या दु:खातच वयाच्या ८० व्या वर्षी इ.स. १२८७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यमापन प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा?**

१) तराईनची दुसरी लढाई केव्हा झाली?
२) महम्मद घोरी हा कोणत्या प्रदेशाचा सुलतान होता?
३) चालीस गुलामांच्या संघाची स्थापन कोणी केली?
४) रझीया सुलतान कोणाची मुलगी होती.
५) सुलतान अल्तमश हा कोणाचा गुलाम होता?

## २.३ खिलजी घराणे

खिलजी घराणे हे मुळचे तुर्कस्थान मधील होते. परंतु अफगाणिस्थानात अनेक वर्ष खिलजी लोकांचे वास्तव्य राहील्यामुळे त्यांच्यावर अफगाण संस्कृतीचा प्रभाव आधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांना भारतात अफगाणी म्हणुनच अधिक प्रमाणात ओळखले गेले. महमद गझणी आणि महम्मद घोरीच्या सैन्यात खिलजी सरदारांनी नौकरी केली महम्मद घोरीच्या प्रमुख चार गुलामामध्ये एक गुलाम इख्तियार–बीन–बख्तियार खिलजी बंगाल व बिहार प्रांताचा प्रमुख सुभेदार होता. तेव्हापासून बंगालच्या भुमिवर व परिसरात खिलजी वंशाचे प्राबल्य होते. अनेक वेळेस त्यांनी दिल्लीच्या सुलतान सत्तेला आव्हाण दिले होते. मुख्यता मध्य आशियातील मंगोलाच्या आक्रमणामुळे अफगाणीस्थानातील खिलजी लोक मोठ्या प्रमाणात भारतात आले परंतु प्रारंभी पासूनच दिल्लीच्या सुलातानशाहीवर तुर्कांचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी आपल्या शिवाय इतर लोकांना सत्तेच्या जवळ येऊ दिले नाही तरी पण जालालुद्दिन खिलजी सारखे कर्तबगार सरदार आपल्या स्वपराक्रमामुळे गुलाम घरण्याच्या प्रशासनात काही प्रमाणात स्थान निर्माण करू शकले व संधिच्या शोधात होते. दिल्लीचा सुलतान बल्बनचे उत्तर अधिकारी दुर्बल निघाले त्याच संधिचा फायदा भारतीय मुसलमान आणि जलालुद्दिन खिलजी ने घेतला आणि दिल्लीवरील गुलाम घराण्याची सत्ता संपुष्टात आणुन इ.स. १२९० मध्ये खिलजी घराण्याची सत्ता स्थापन केली.

**२.३.१ जलालुद्दिन खिलजी इ.स. १२९० ते १२९६:** गुलाम घराण्यातील सुलताना बल्बनचा उत्तर अधिकारी कैकुबाद हा दुर्बल व अकार्यक्षम निघाला व व्यसनाधिनतेमुळे आजारी पडला. त्यामुळे तुर्की अमिर सरदारानी त्याचा तीन वर्षाचा पुत्र कैखुसरो दिल्लीच्या सिंहासनावर बसविले आजारी असलेल्या कैकुबादवर जलालुद्दिन ने आपला प्रभाव निर्माण केल त्यामुळे तो कैसुखरो संरक्षक बनला आणि राज्याची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतले. आपल्याच वंशातील एका सरदारकडुन कैकुबादची हत्या घडुन आणली कैखुसरो दि. १३ जुन १२९० मध्ये कैदेत टाकुन दिल्ली शेजारी किलघडी येथे जलालुद्दिन खिलजीने स्वत:चा राज्यभिषेक करून घेतला व इ.स. १२९० पासून इ. स. १२९६ पर्यत दिल्लीचा सुलतान म्हणुन राज्यकारभार केला.

**अ) सुलतान जलालुद्दिनची कामगीरी**: जलालुद्दिन खिलजीने गैरतुर्की भारतीय मुस्लिमांची मदत घेऊन खिलजी सरदारांना सोबत घेऊन बल्बनच्या वारसदारला सत्तेतून बाजूला सारून गुलाम वंशाचा शेवट केला व दिल्लीवर खिलजी घराण्याची सत्ता स्थापन केली. यामुळे जलालुद्दिन खिलजी यास दिल्ली दरबारातुन जुन्या सुभेदार व वारसदाराकडुन आणि बल्बनच्या इतर वारसदाराकडुन विरोध झाला नाही असे नाही परंतु या सर्व समस्येवर जलालुद्दिनने सयंमाने मार्ग काढून आपल्या विरोधकावर मात केली.

बल्बनचा पुतण्या मलिक छज्जु यांच्याकडील कडा व मनिपुरची सुभेदारी कायम ठेवली. ज्या अमिर सरदारांनी जलालुद्दिन खिलजीस पाठींबा दिला होता त्यांना महत्वाचे पदे दिली. जलालुद्दिनने आपल्या विरोधकाविषयी मवाळ धोरणाचा अवलंब केला. आपल्या विरोधात कटकारस्थाने रचलेल्या लोकांना कडक शिक्षा दिल्या. जलालुद्दिनच्या काळात मंगोलानी भारतावर इ.स. १२९० मध्ये आक्रमण केले तेव्हा स्वत:ससैन्य जलालुद्दिनी वायव्य प्रदेशात जाऊन मंगोलाचा नेता अब्दुलाचा पराभव केला. जलालुद्दिन सुलतान असताना त्याचा पुतन्या व जावाई अल्लाऊद्दिन खिलजीने मध्य प्रदेशातील भिलवर स्वारी केली. त्या स्वारित प्रचंड लुट मिळाली. तसेच इ.स. १२९६ मध्ये देवगिरीच्या यादव घराण्यावर आक्रमण केले. या स्वारीबद्दल सुलातानाला आंधारात ठेवले. अचानक

देवगीरीवर आक्रमण केल्यामुळे यादव राजा रामचद्रं देवाचा पराभव झाला. अल्लाऊद्दिनला या स्वारीत अगणित संपत्ती मिळाली.

**आ) जलालुद्दिन खिलजीची हत्या**: जलालुद्दिन खिलजीचा पुतन्या व जावाई अल्लाउद्दिन खिलजी यांने सुलतानास माहिती न देता दक्षिणतील देवगिरीवर हल्ला केला व मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळविली ही संपत्ती व केलेली लुट सुलतानास देण्याची इच्छा अल्लाउद्दिन खिलजी ची नव्हती. याच संपत्तीच्या बळावर दिल्लीचे सिंहासन मिळविण्याची महत्वकांक्षा अल्लाउद्दिन बाळगुन होता. ही लुट घेऊन दिल्लीला न जाता सुलतान जलालुद्दिन यास कडा व मनिपुर या ठिकाण येण्याचे नियंत्रण दिले. जलालुद्दिन उदार अंतकरणाने भेटीसा निघाला. पूर्ण तयारीसी असलेल्या अल्लाउद्दिन खिलजीने २० जुलै १२९६ रोजी सुलतान जलालुद्दिनची हत्या करून स्वतःस दिल्लीचा सुलतान म्हणुन घोषित केले.

**१.३.२ अल्लाउद्दिन खिलजी इ.स. १२९६ ते १३१६:** मध्ययुगीन भाराताच्या इतिहास जेवढे ही कर्तबगार व पराक्रमी सुलतान, बादशाहा होऊन गेले. त्यामध्ये अल्लाउद्दिनचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. तो खिलजी घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान तर होताच पण सुलतानशाहीतील पहिला श्रेष्ठ शासक म्हणुन त्यांचा उल्लेख केला जातो. तसेच दक्षिण भारतावर आक्रमण करणारा अल्लाउद्दिन हा पहिला सुभेदार आणि सुलतान होता. जवळ जवळ सर्व उत्तर भारत आणि दक्षिण भारतात अल्लाउद्दिन ने विशाल साम्राज्य विस्तार केला म्हणुन मध्ययुगीन भारताच्या इतिहासात पहिल्यांदा एक छत्री अमल प्रस्थापित करण्याचे काम अल्लाउद्दिन ने केले होते म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एवढेच नाही तर विस्तिर्ण पसरलेल्या साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी उत्कृष्ट अशा प्रशासन व्यवस्थेची निर्मिती केले. अर्थव्यवस्था सुधारावी, सैन्याचां खर्च भागावा म्हणुन बाजार नियंत्रण धोरण अवलंबीले त्याच बरोबर क्रांतीकारी योजनांची अंमलबजावणी करून सुधारक म्हणुन आपले नाव अजरामर केले.

**अ) पुर्वचरित्र**: अलाउद्दिन हा जलालुद्दिन खिलजीच्या भावाचा मूलगा होता त्याचे मुळ नाव अलिगुसशस्प होते. त्यांचा पिता शहाबुद्दिन खिलजी हा होता. तो बल्बनच्या सैन्यात होता. अलाउद्दिन अगदी लहान असताना त्याच्या पित्याचा मृत्यू झाला त्यामुळे अलाउद्दिन व त्यांच्या भावांचे पालन पोषन व शिक्षणाची व्यवस्था चुलता जलालुद्दिन खिलजी यानेच केली. अलाउद्दिनच्या साहसी, धाडसी आणि पराक्रमी वृत्तीमुळे सुलतान जलालुद्दिनच्या दरबारात अलाउद्दिनला महत्वाचे स्थान होते तसेच आपली मुलगी त्यास देऊन सुलतानाने आपला जावाई बनविले आणि कडा व मानिकपुरची सुभेदारी दिली त्यामुळे अलाउद्दिनची दिल्ली दरबारात प्रतिष्ठा वाढली.

**आ) कडा व मानिकपुरची सुभेदारी आणि दक्षिणेवर आक्रमण**: सुलतान बल्बनचा पुतण्या मलिक छज्जु यांच्याकडे कडा व मानिकपुरची जाहागिरी होती ती सुलतान जल्लालुद्दिन ने तशीच ठेवली होती परंतु मलिक छज्जुने सुलतान विरोधात बंड केले त्यामुळे त्याची कडा व मानिकपुरवरून हकालपट्टी केली आणि आपला पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी यास आपली मुलगी देऊन जावाई बनविले व कडा व मानिकपुरची सुभेदारी दिली. याच सुभेदारीवर असताना दिल्ली सुलतानच्या अनुमती शिवाय अल्लाउद्दिन ने दक्षिण भारतातील वैभव संपन्न असलेल्या देवगीरीच्या यादव घराण्यावर इ.स. १२९६ मध्ये हल्ला केला. त्यावेळी यादवांचा राजा रामचंद्रदेव होता तर त्याचा

पुत्र सिंघणदेव हा ससैन्य दक्षिणेच्या मोहिमेवर होता. अल्लाउद्दिन देवगीरीवर [illegible] निर्माण करण्यासाठी हे केवळ आघाडीचे सैन्य आहेत. दिल्लीची विशाल फौज येत आहे अशी धमकी दिली. त्यावेळी विद्युत गतीने सिंघणदेव देवगीरीवर पोहचला परंतु काही उपयोग झाला नाही. रामचंद्रदेव व अल्लाऊदिन यांच्यातील तहात ६०० टन सोने, ७ मण मोती, २ मण हिरे, १००० टण चांदी व ४००० रेशीम वस्त्राच्या गाठी मिळाल्या. अशी प्रचंड लुट घेऊन अल्लाउद्दिन आपल्या जहागीरीत परत गेला.

**इ) दिल्लीच्या सुलतानपदी विराजमाण**: अल्लाउद्दिन हा अत्यंत महत्वकांक्षी होता देवगीरीवर मिळालेल्या प्रचंड संपत्ती मुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि त्यास दिल्लीचे सिंहासन दिसू लागले अत्यंत चाणक्षपणे योजना आखुन देवगीरीवर मिळालेली लुट सुलतानला देण्यासाठी म्हणून कडा येथे बोलाविले व मानीकपुर येथे ससैन्य जाऊन सुलतानाची भेट घेतली व २० जुलै १२९६ रोजी जल्लालुद्दिन यास ठार केले. पुढे तिन दिवसात दिल्ली गाठुन ''अल्लाउद्दिनीया बदिन मुहम्मदशाहा सुलतान'' अशी उपाधी घेऊन स्वतःस दिल्लीचा सुलतान म्हणुन घोषित केले.

**ई) अल्लाउद्दिन खिलजीची कामगीरी**: सुलतान जल्लालुद्दिन खिलजी हा अत्यंत शांत व संयमी स्वभावाचा होता. त्यामुळे प्रजेच्या मनात त्याच्या विषयी मोठी सहानुभुती आणि प्रेम होते अशा सुलतानाची हत्या त्याच्या पुतन्या व जावाई अल्लाउद्दिन ने केल्यामुळे प्रजेच्या मनात हत्या करणाऱ्या सुलातानाविषयी तीळ मात्रही अपुलकी राहिली नाही. तसेच जल्लालुद्दिनची विधवा पत्नी मलिका–ए–जहाँने आपला पुत्र कुद्रखॉला सुलतान पदावर बसविले. त्या वेळेस अल्लाउद्दिन दिल्लीचे सिंहासन प्राप्त करण्यासाठी संपत्ती आणि बळाचा वापर केला. देवगीरीची प्रचंड संपत्ती अल्लाउद्दिनने अमिर, सरदार, सुभेदार व गोर गरिबांना वाटली ज्यांनी संपत्ती नाकारली. त्यांच्यासाठी बळाचा वार केला. सुलतानाची हत्या केल्याचा कलंक पुसुन टाकण्यासाठी सर्व सामान्याना अन्न,वस्त्र व दिल्लीच्या सैन्याना सहा महिन्याचा पगार आगोदरच दिला आणि प्रजा व सैन्याची सहानुभुती मिळविली सुलतान जल्लालुद्दिन स्वभावाने उदार, शांत असल्यामुळे सुलतान पदाचा धाक राहिला नव्हता. बऱ्याच राजपुत राज्यानी स्वतःला स्वतंत्र घोषित केले होते. मंगोल भारतावर आक्रमण करण्याच्या तयारीत होते. दिल्लीला अस्थिर करणाऱ्या दोआबच्या प्रदेशात अशांतता पसरली होती. देवगीरीच्या यादवानी खिलजीचे वर्चस्व नाकारले होते. अशा अनेक अडचणी सुलतानासमोर होत्या सुलतान पदाची सूत्रे हाती घेताच संपत्ती आणि बळाचा वापर करून अंतर्गत संकटावर मात केली. आपल्या विश्वासातील कार्यक्षम अधिकाऱ्यांना महत्वाच्या पदावर नेमणुका दिल्या साम्राज्य विस्तार वादी धोरणाचा अंगीकार करून गुजरात, रणथंबोर, मेवाड, माळवा व जालौर या उत्तरभारतातील राज्यावर विजय मिळवून त्या राज्याना आपल्या वर्चस्वाखाली आणल्यानंतर आपला मोर्चा दक्षिण भारताकडे वळविला आणि दक्षिणेतील देवगीरी, वरंगल, होयसळ, मदुराई या राज्यावर देखील आपल्या मल्लीककाफुरया सेनापतीच्या नेत्रत्वाखाली विजय मिळविला. त्याच बरोबर मंगोल आक्रमणाचा ही बंदोबस्त केला.

**१.३.३ अल्लउद्दिन खिलजीने केलेल्या सुधारणा:** अल्लाउद्दिन खिलजी हा सुलतान दिल्लीच्या सुलातानशाहीतील सर्वात पराक्रमी, कर्तबगार, कार्यक्षम आणि महत्वकांक्षी सुलतान म्हणुन ओळखला जातो. उत्तर व दक्षिण भारताच्या दिग्विजय बरोबरच त्यांनी परकिय आक्रमणाचा बंदोबस्त केला हे सर्व करण्यासाठी त्यास खुप मोठी किंमत मोजावी लागली. प्रशासन, महसुल, सैन्य व इतर विभागात हजारो लोकांना सहभागी करून घ्यावे लागले, तसेच साम्राज्याच्या

सुरक्षिततेसाठी लाखो सैन्य उभारावे लागले, त्यांच्यावर खर्च ही खूप मोठ्या प्रमाणात होत होता त्यामुळे सुलतानास विविध क्षेत्रात सुधारणा करणे भाग पडले म्हणून अल्लाउद्दीनने महसूल, सैन्यव्यवस्था, न्यायव्यवस्था, आर्थिक सुधारणा व बाजार नियंत्रण इत्यादी क्षेत्रात आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या त्या पुढील प्रमाणे.

**अ) राजसत्तेचा सिद्धांत**: सुलतान अल्लाउद्दिन खिलजी ने स्वतःला सर्वश्रेष्ठ व निरंकुश बनविले. विरोधकांना कठोर शिक्षा करून आपल्या विषयी भितीचे वातावरण निर्माण केले व सुलतान बल्बन प्रमाणे दैविअधिकाराच्या सिध्दांताचा पुरस्कार केला व प्रधान उलेमांचे वर्चस्व झुगारून दिले. तसेच अमिर उमराव एकत्र येऊ नयेत म्हणून त्यांच्यात होणाऱ्या विवाह संबंधास सुलतानांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक केले त्या बरोबरच दारू, जुगार यामुळे व्यक्ती मोठ्या प्रमाणात एकत्र येतात. म्हणुन दारू, जुगार आणि अमिर उमराव यांच्यातील होणाऱ्या मेजवान्यांमध्ये दारूवर बंदी घातली व सुलतानाचे हेर खाते अत्यंत कार्यक्षम बनविले.

**आ) महसुल विभागात सुधारणा**: अल्लाउद्दिन खिलजी ने महसुल खात्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या, ह्या सर्व सुधारणा सुलतानाचे हित डोळ्यासमोर ठेवून केलेल्या होत्या सुलातनशाहीमध्ये नौकर वर्ग मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे त्यांचा ताण सुलतानाच्या तिजोरीवर पडला होता. त्यामुळे खिलजीने प्रथम आपल्या साम्राज्यातील जमिनीची मोजणी करून त्या आधारे शेतसार (महसुल) ठरऊन दिला. तसेच शेतीवरील कराचे प्रमाण वाढवून उत्पन्नाच्या पन्नास टक्के इतका महसुल लावला तसेच पारंपरिक जाहागीरी देण्याची प्रथा बंद केली अमिर, उमराव, सरदार यांच्याकडील संपत्ती मुळे ते सुलतानाविरोधी बंड करतात म्हणुन त्यांच्याकडील संपत्ती वेगवेगळे कारणे लाऊन काढून घेतली. त्या कालावधित जास्तीत जास्त शेतकरी वर्ग हिन्दु होता आणि हिन्दु राजपुत्राना संधिमीळताच ते विद्रोह करतात त्यामुळे त्यांच्यावर शेती शिवाय विवाह कर, आयात, निर्यात, चराई आणि जिझिया सारखे इतर कर मोठ्या प्रमाणात लावले.

**इ) सैन्य व न्यायव्यवस्थेत सुधारणा**: सुलतान अलाउद्दिन खिलजी ने विशाल साम्राज्य विस्तार केलेला होता या विशाल व विस्तीर्ण पसलेल्या साम्राज्याच्या रक्षणासाठी त्याच पद्धतीची फौज उभी करावी लागली. हा दृष्टीकोण समोर ठेवुन सैन्यव्यस्थेत अमुलाग्र बदल केला. आरिज–ए–मुमलिक हा प्रशासनात एक स्वतंत्र विभाग निर्माण करून पूर्ण सैन्यव्यवस्थेचे काम या विभागाकडे दिले याच विभागामार्फत सैन्य भरती खडे सैन्य, सिमा सुरक्षा सैन्य, राजधानीत सैन्य तसेच इतर विविध दलातील सैन्य संख्या, सैन्यांच्यानोंदी आणि त्यांच्यावर होणारा खर्च इ. काम दिले. तसेच घोडयामध्ये बदल होऊ नये म्हणुन घोडयांना डाग देण्याची प्रथा सुरू केली.

लष्करी सुधारणे बरोबरच न्याय व्यवस्थेत देखील मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या विद्रोह, बंड व गुन्हा करणाऱ्यासाठी अत्यंत कठोर दंड संहिता निर्माण केली. न्यादानासाठी मुख्य काझी व प्रांतीय काझीच्या नेमणुका केल्या. कधिकधी न्यायदानाचे काम स्वतः सुलतान करीत असे तो सुलतानशाहीचा सर्वोच्च न्यायाधीश होता.

**ई) बाजार नियंत्रण व किंमतीवर अंकुश**: सुलतान अलाउद्दिन खिलजी यांनी ज्या विविध सुधारणा केल्या त्या पैकी सर्वात महत्वाची आणि ज्या सुधारणेमुळे अलाउद्दिन सुधारक म्हणुन प्रसिद्धिस आले ती सुधारणा म्हणजे बाजार नियंत्रण व विविध मालाच्या किंमतीवर ठेवलेला अंकुश होय. सर्वसामान्य जनतेचे हीत आणि लोक कल्याण लक्षात घेऊन ही सुधारणा केली गेली नाही तर

आपल्या साम्राज्याच्यारक्षणासाठी व मंगोलांच्या आक्रमणाच्या भिती पोटी प्रचंड सैन्य संख्या वाढविला तसेच प्रशासन चालविण्यासाठी तो अधिकारी वर्ग निर्माण केला. त्यांना दिलेल्या पगारातुन त्यांचा व त्यांच्या कुटुंबांचा खर्च भागला पाहिजे. त्यांना पगार वाढुन देणे तर शक्य नाही म्हणुन वस्तुच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शहना–ए–मंडी व दिवाण–ए–रियासत या दोन विभागाची स्थापन केली. विविध प्रकारच्या धान्याच्या, कडधान्याच्या, कापडाच्या, जनावराच्या, गुलामांच्या व जीवनावश्यक इतर वस्तुच्या किंमती निश्नित केल्या. सुलतानाने एक आदेश काढला की शेतकऱ्यांनी आपले धान्य सरकारने ठरवून दिलेल्या व्यापाऱ्यांनाच ठरवून दिलेल्या किंमतीतच विकावे तसेच व्यापाऱ्यानेही तो माल निश्चित करून दिलेल्या किंमतीतच विकावे. नियमांचे उलंघन केले तर कडक शिक्षा दिली जात असे.

**ऊ) अल्लाउद्दिन खिलजीचे मुल्यमापन**: खिलजी घराण्यातील नव्हे तर दिल्ली सुलतानशाहीतील सर्वश्रेष्ठ सुलतान म्हणुन अलाउद्दिन ओळखला जातो. तो एक उत्कृष्ट प्रशासक, राजनिती तज्ज्ञ, कुटनिती तज्ज्ञ, महान सेनानी, विद्वानांचा आश्रयदाता, साहित्य व कलेची आवड असणारा सुलतान होता. त्याच्या दरबारात प्रसिद्ध साहित्यीक अमिर खुसरो, अमिर हसन सारखे धर्मपंडित होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मशिदी, किल्ले आणि तलाव बांधले. अलाई दरवाजा, सिरीचा किल्ला बांधुन स्थापत्य कलेची आवड असल्याचे दाखऊन दिले. सुलतानाच्या अंगी सद्गुना बरोबरच अनेक दुर्गुनही होते. त्यांनी हिन्दुना निर्दयीपणे वागविले. त्याच्यावर मोठ्या प्रमाणात कर लावले जिझिया सारखा अन्यायकारी कर लावला. त्यामुळे हिन्दुना जीवन जगणे असहय झाले. तरी पण मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक यशस्वी सुलतान अल्लाउद्दिन खिलजी म्हणुन ओळखला जातो.

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यमापन प्रश्न रिकाम्या जागा भरा**

१) खिलजी घराण्याची स्थापना इ.स........मध्ये झाली

१) देवगीरीवर पहिले मुस्लीम आक्रमण.......यांनी केले.

३) खिलजी घरण्याचा संस्थापक.......हा सुलतान ठरतो

४) अलाई दरवाजा कोणत्या सुलतानाने बांधला........

५) मलिक काफुर हा........सुलतानाचा सेनापती होता.

## २.४ तुघलक घराणे इ.स. १३२० ते इ.स. १४१४

दिल्ली सुलतान शाहीचा अभ्यास करता असताना खिलजी घराण्यांनंतर ज्या घराण्याने सुलतानशाहीच्या राजसिंहासनावरून राज्यकारभार केला त्या तुघलक घराण्याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. खिलजी घराण्यातील सर्वश्रेष्ठ सुलतान अलाउद्दिन खिलजीचे अखेरचे दिवस अत्यंत वाईट स्थितीत गेले. कारण त्यांनी आपल्या कुंटुबातील व्यक्तीवर अविश्वास दाखविल्यामुळे ते दुर गेले त्यामुळे सर्व सत्ता सेनापती मलिक काफुरच्या हाती केंद्रीत झाली. त्याने या संधिचा फायदा घेऊन आपली सर्व शक्ती आपल्या शत्रुंना, सुलतानाच्या कुटुंबातील वारसांना संपविण्यात खर्च केली. त्याच कालावधित उत्तर व दक्षिण भारतातील अनेक राजकीय सत्तानी खिलजी घरण्याचे वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र घोषित केले. त्यामुळे सुलतान अल्लाउद्दिन पूर्ण खचला आणि अत्यंत निराश अवस्थेत जानेवारी १३१६ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर मल्लिक काफुरने रामचंद्र देवाच्या मूलीपासून झालेल्या अल्लाउद्दिनच्या शहाबुद्दिन या अल्पवयीन पुत्रास गादीवर बसऊन सर्व सत्ता आपल्या हाती घेतली व खिलजी घराण्यातील इतर वारसदाराना ठार करण्याचे सत्र सुरू केले; पण यात त्याचाही मृत्यू झाला. त्यावेळी अल्लाउद्दिनचा दुसरा पुत्र मुबारक शाहा सुलतान बनला, परंतु